दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर


# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९० ●मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




*ढेकणमोह : पहाटेच्या वेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथील विहंगम असे दृश्य टिपले आहे छायाचित्रकार कैलास लांडे यांनी.*

# शिंदे सत्तेबाहेर, ठाकरेही करणार नाही समर्थन
# तरी मुंबईत भाजपचा होणार महापौर ?

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या मुंबईत ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. इथं शिवसेनेची २५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाला मुंबईत बहुमत मिळवण्यात अपयश आलं आहे.

इथं भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला असून शिवसेना शिंदे गटाच्या साथीनं महायुतीनं बहुमताचा आकडा पार केला आहे. भाजपकडे संख्याबळ अधिक असल्याने मुंबईत भाजपचा महापौर होणार, हे जवळपास निश्चित झालं आहे. मात्र एकनाथ शिंदे यांच्या खेळीमुळे मुंबईच्या महापौर पदावरून मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे.

महापौर पदासाठी शिंदेंकडून भाजपवर दबाव- खरं तर, मुंबई महापालिकेत भाजप आणि शिवसेना शिंदे गटानं एकत्रित निवडणूक लढवली होती. या



निवडणुकीत भाजपनं ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान जिंकला. शिंदे गटाच्या मदतीने ▶ उर्वरित पान २ वर

### ● बहुमताचा आकडा कमी करण्याची रणनीती

**दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली असली तरी ठाकरे गटाकडून भाजपला थेट समर्थन दिलं जाणार नाही. महापौर पदाच्या निवडीच्या वेळी ठाकरे गटाचे ६५ नगरसेवक गैरहजर राहणार असल्याची रणनीती आखली आहे. ठाकरेंचे ६५ नगरसेवक गैरहजर राहिले तर सभागृहातील उपस्थितीत सदस्यांची संख्या १६२ होते. अशात बहुमताचा आकडा ११४ वरून थेट ८२ वर येतो. अशा स्थितीत मुंबई महापालिकेत भाजपला स्वबळावर महापौर करता येऊ शकतो, अशीच काहीशी रणनीती आता भाजपकडून आखली जात असल्याची चर्चा आहे.**

# ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे बंजारा समाजातील
# शेतमजुराच्या मुलीला मिळाले जीवनदान

**जालना । प्रतिनिधी**

वंचित/ पिडीतांसाठी नेहमीच पुढाकार घेवुन काम करणाऱ्या राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे बंजारा समाजातील एका शेतमजुराच्या मुलीला दवाखान्यात वेळीच उपचार झाल्याने जीवनदान मिळाल्याचा प्रत्यय नुकताच आला. आपली मुलगी संकटातून



सुखरूपपणे बाहेर आल्याचे बघताच पालकांना आनंदाश्रु रोखता आले नाहीत. या संकट काळात केलेल्या सहकार्याबद्दल तिच्या पालकांसह ग्रामस्थांनी ना.पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. झाले असे की, अंबड (जि.जालना) तालुक्यातील कुक्कडगाव येथील कृष्णा धोंडीराम राठोड हया शेतमजूराची कौटूंबिक स्थिती अत्यंत नाजुक होती, त्यांचे पुर्णपणे हातावर पोट आहे. शेतमजुरी ▶ उर्वरित पान २ वर

### पालक व ग्रामस्थांनी मानले आभार

**ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे शेतमजुराची मुलगी संकटातून सुखरुपपणे बाहेर पडल्याबद्दल तिचे वडील कृष्णा राठोड व कुक्कडगाव येथील ग्रामस्थांनी ना.पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.**

# 'केवळ अपमानास्पद भाषा वापरणे गुन्हा नाही; 'अ‍ॅट्रॉसिटी'साठी.....' : सुप्रीम कोर्टाचा मोठा निकाल

**नवी दिल्ली**

केवळ अपमानास्पद भाषा वापरणे हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा ठरू शकत नाही. जोपर्यंत संबंधित व्यक्तीचा अपमान करण्यामागे तिची 'जात' हे कारण नसते किंवा तिला जातीवरून कमी लेखण्याचा हेतू नसतो, तोपर्यंत केवळ अपमानास्पद शब्द वापरले म्हणून हा कायदा लागू होत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे



यांच्या खंडपीठाने दिला. संबंधित प्रकरणात एफआयआर (ऋखठ) किंवा दोषारोपपत्रात (उहरीसश-ीहशशीं) आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा किंवा जातीवरून अपमान केल्याचा कोणताही ठोस उल्लेख नसतानाही ही कारवाई सुरू ठेवण्यात आली होती. या प्रकरणी सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने चूक केली, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले. 'लाईव्ह लॉ'च्या रिपोर्टनुसार, बिहारमधील एका अंगणवाडी केंद्रात शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप आरोपीवर होता. संबंधितावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. १५ फेब्रुवारी २०२५ ▶ उर्वरित पान २ वर

## शालेय राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेत बीड जिल्हा खेळाडूचे वर्चस्व कायम



**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य साहित्य व जिल्हा क्रीडा परिषद जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सांगली. दिनांक १७ते १९ जानेवारी रोजी मनेराजुरी तालुका तासगाव जिल्हा सांगली या ठिकाणी श्री लक्ष सैनिकी विद्यालय या ठिकाणी संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून बीड जिल्ह्यातील बीड जिल्हा व शहर -डो असोसिएशनच्या बीड खेळाडू १९ वर्षातील ओमकार कदम कास्यपदक तसेच , संघर्ष जायभाय याने कास्यपदक व १७ वर्ष आतील रितेश राठोड रोपे पदक, ज्योतीराम जगदाळे , यांनी सहभाग नोंदवला मुलीमध्ये १९ ▶ उर्वरित पान २ वर







# 'रस्ते सुरक्षा अभियान 2026 ' अंतर्गत जिल्ह्यात दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्ती

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यामध्ये होणारे मृत्यू रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने आता आक्रमक पाऊल उचलले आहे. १९ जानेवारीपासून संपूर्ण जिल्ह्यात हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे परिसर आणि शासकीय कार्यालयांच्या प्रवेशद्वारांवर कडक नाकाबंदी करून कारवाई केली जाणार आहे.

जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत मांडण्यात आलेल्या धक्कादायक आकडेवारीनंतर हा निर्णय घेण्यात आला. जिल्ह्यात झालेल्या एकूण दुचाकी अपघातांपैकी तब्बल ९० टक्के मृत्यू हे केवळ हेल्मेट न वापरल्यामुळे



झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र शासनाच्या 'रस्ते सुरक्षा अभियान २०२६ ' अंतर्गत ही मोहीम राबवली जात आहे. केवळ सामान्य नागरिकच नव्हे, तर पोलिस दलासह सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही ही कारवाई कठोरपणे केली जाणार आहे. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत ▶ उर्वरित पान २ वर

# नाथापूरात महसूल आढावा बैठक ठरली लोकसंवादाचे जिवंत उदाहरण

### तहसीलदार शेळके यांचे ' प्रशासन आपल्या दारी ' चा प्रभावी प्रत्यय

**नाथापूर । प्रतिनिधी**

नाथापूर ( ता . बीड ) येथे सोमवार १९ रोजी पिंपळनेर महसूल मंडळाची मंडळस्तरीय महसूल आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता , जनतेच्या वेदना ऐकून घेणारी , प्रश्नांना वाट मोकळी करून देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली . ' शासन आपल्या दारी ' या संकल्पनेचा खरा अर्थ या बैठकीत अनुभवायला मिळाला - कारण प्रशासन गावात आले , आणि नागरिकांचे प्रश्न थेट समोर आले .

ग्रामपंचायत सचिवालय सभागृहात झालेल्या या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . त्यांच्या उपस्थितीत



महसूल दाखले , फेरफार , वारसा हक्क , जमीन नोंदी , शेतीविषयक अडचणी , पीकविमा , अ‍ॅग्रीस्टॅक , बळीराजा शेतकरी सन्मान योजना तसेच गावातील रस्त्यांशी संबंधित प्रकरणांवर सविस्तर चर्चा झाली . नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देत , नियमांच्या चौकटीत तात्काळ व पारदर्शक कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश तहसीलदार शेळके यांनी दिले. ▶ उर्वरित पान २ वर

# धान्य ते माय बाप ज्यांच्या घरी संत जन्म घेती: ह भ प श्रावण महाराज जगताप

### ● नाथांच्या तपाने पुनीत झालेली भूमी गोरक्षनाथ टेकडी

**बीड । प्रतिनिधी**

जगात सर्वात भाग्यवान कोण असेल तर ते साधू संतांचे आई वडील आहेत आज ज्या आई वडिलांनी संत साधू बाबा यांना जन्म दिला ज्या आई वडिलांनी किसान बाबा व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांना जन्म दिला ते आई वडिलांचे भाग्य सर्वात





मोठे आहे. ज्या आई वडिलांनी जगाच्या कल्याणासाठी आपल्या लेकरांना समाजासाठी अर्पण केलं ते आई वडिलांनी खरंच भाग्यवंत आहेत.असे अभंग विवेचन करताना ह भ प श्रावण महाराज जगताप यांनी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन सेवा अर्पण करताना व्यक्त केले ▶ उर्वरित पान २ वर

### ▸ आज महाप्रदाच्या महापांगती

**श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता व महाप्रसादाच्या महापंक्ती होणार**

### ▸ आज टेकडी येथे सप्ताह सांगता

**आज दि. २० जानेवारी मंगळवार रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांचे १० ते ११ प्रवचन व ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तन दुपारी १२ ते ०२ वेळेत संपन्न होणार आहे .**

# मतदार आपला मताधिकार का विकत आहेत ? लोकशाहीच्या रथाचे चाक कशात रुतले आहे ?

शिवरायांची स्वराज्यक्रांती कशी आणि का यशस्वी झाली, हे सांगताना एका प्रतिभावान कवीने आपल्या काव्यात एक विलक्षण कथानक उभे केले आहे. त्या कथानकात अवघा दहा-बारा वर्षांचा कोवळा पोरगा त्याच्यासमोर आलेल्या सशस्त्र घोडदळाला ठणकावून सांगतो,

● खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे,
चिंधड्या उडवीन राई-राई एवढ्या!

या प्रसंगातून कवीला हे अधोरेखित करायचे आहे की स्वराज्य ही संकल्पना केवळ शिवराय आणि रणांगणात लढणाऱ्या मावळ्यांपुरती मर्यादित नव्हती. हे स्वराज्य माझे आहे आणि त्याचे रक्षण करणे ही माझी जबाबदारी आहे ही भावना स्वराज्यातील प्रत्येक घटकाच्या मनात रुजली होती. प्रसंगी प्राणही पणाला लावण्याची तयारी ही रयतेच्या स्वराज्यावरच्या अतूट विश्वासातूनच निर्माण झाली होती. रयतेचा हा विश्वास हेच स्वराज्य उभे राहण्याचे आणि टिकण्याचे खरे गमक होते.

स्वराज्याच्या त्या क्रांतीला आज ३५०-४०० वर्षे उलटून गेली आहेत. राजेशाही नाकारून जगाने लोकशाही ही अधिक प्रगत व्यवस्था स्वीकारली. मात्र एवढ्या दीर्घ काळानंतरही एक मूलभूत प्रश्न उरतोच, आजच्या लोकशाहीत राज्यकर्त्यांनी जनतेच्या मनात देशाबद्दल, राज्याबद्दल, व्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण केला आहे काय?,

● हा देश आपला आहे, ही सत्ता आपल्यासाठी आहे असे लोकांना खरेच वाटते काय? म्हणूनच कदाचित शिवराय आणि स्वराज्य आजही आपल्याला प्रेरित करत राहतात. याचे नेमके उत्तर गोविंद पानसरे यांनी त्यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकात दिले आहे. स्वराज्याच्या इतिहासाचे आकर्षण हे शिवरायांनी रयतेच्या मनात निर्माण केलेल्या विश्वासात दडलेले आहे आणि तोच विश्वास निर्माण करण्यात आजची व्यवस्था अपयशी ठरली आहे, हे त्यांचे विश्लेषण अत्यंत रास्त आहे.



● पैसा, सत्ता आणि मतांची बाजारपेठ

ओबीसी आरक्षणाच्या सबबीखाली ३-४ वर्षे रखडलेल्या नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकांत सर्वच प्रस्थापित पक्षांनी, विशेषतः सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्या लाभार्थी मित्रपक्षांनी, अमाप पैसा ओतला. येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतही हेच चित्र दिसणार, यात शंका नाही.

निवडणुकीतील पैसा, गुंडगिरी, बूथ कॅप्चर हे प्रकार नवीन नाहीत. जात-धर्म, भाषा, प्रांत अशा अस्मितांच्या जोडीला धनशक्ती, दादागिरी, दबावतंत्र हे भारतीय निवडणूक प्रक्रियेतील जुनेच शस्त्र आहेत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते,

सामाजिक व आर्थिक समानतेशिवाय खरी लोकशाही शक्य नाही.

मात्र नुकत्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतांच्या खरेदी-विक्रीने जो कळस गाठला, तो लोकशाहीसाठी भयावह आहे.

● 'एक व्यक्ती, एक मत' - पण विश्वास कुठे हरवला?

संविधान निर्मितीच्या वेळी मताधिकाराबाबत अनेक मतप्रवाह होते. शिक्षितांनाच मतदानाचा अधिकार द्यावा का, असा विचारही मांडला गेला. मात्र बाबासाहेबांनी ठामपणे सांगितले की राजकीय शहाणपणाचा औपचारिक शिक्षणाशी थेट संबंध नाही. जात, धर्म, वर्ण, वर्ग, भाषा, लिंग, प्रांत कोणताही भेद न करता एक व्यक्ती, एक मत या तत्त्वाचा आग्रह त्यांनी धरला.

या मताधिकाराने शतकानुशतके उपेक्षित राहिलेल्या समाजाला सन्मान, ओळख आणि आत्मविश्वास दिला. ज्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जात होता, त्यांच्याकडे मत मागण्यासाठी उच्चवर्णीयांना झुकावे लागले. माझ्या एका मताने सत्तेचा उन्माद उतरवता येतो हा विश्वास लोकांच्या मनात रुजला.

पण हाच विश्वास उद्ध्वस्त करण्यासाठी धनशक्तीचा वापर करण्यात आला.

● मतदार मत का विकतो?

आज गोरगरीबच नव्हे, तर तथाकथित शिक्षित वर्गही मत विकताना दिसतो. काही ठिकाणी तर घरातील एकूण मतदारांची यादी घेऊन थेट पक्ष कार्यालयात सौदे झाले. हे का घडते?

कारण मतदाराच्या मनात एक ठाम समजूत बसली आहे की, कोणीही निवडून आले तरी भ्रष्टाचार करणारच. प्रामाणिक उमेदवार निवडून येणार नाही, त्याला दिलेले मत 'वाया' जाईल, अशी भावना आहे. त्यामुळे जो 'जिंकणार' त्याच्याकडे झुकण्याची प्रवृत्ती वाढते. पैसा, शक्तीप्रदर्शन, प्रचारयंत्रणा यामुळे हेच उमेदवार पुढे येतात, निवडून येतात आणि सत्तेत जाऊन पुन्हा भ्रष्टाचार करतात.

● यातूनच एक घातक तर्क तयार होतो, पुढे भ्रष्टाचार होणारच आहे, तर त्याचा फायदा आपण आत्ताच का घेऊ नये?

हीच मतविक्रीची मानसिकता आहे.

लोकशाहीचा रथ नेमका कुठे रुतला?

भारतीय लोकशाहीचा रथ

पैशाच्या चिखलात, जात-धर्माच्या खाचखळग्यात, भीती व लालसेच्या दलदलीत आणि जबाबदारीशून्य, भ्रष्ट प्रतिनिधित्वात अडकलेला आहे.

रथावर बसलेले सत्ता, अहंकार आणि संपत्तीच्या तृप्तीत मग्न आहेत आणि शिक्षण, विचार, मूल्ये, संघटन यांशिवाय उभे असलेले नागरिक हा रथ पुढे नेऊ शकत नाहीत.

म्हणूनच आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र तितकाच लागू आहे. म्हणूनच शहीद भगतसिंगांचे क्रांतीची तलवार ही विचारांच्या सहाणेवर परजली जाते

हे वाक्य आजही तितकेच सुसंगत आहे.

लोकशाही वाचवायची असेल,

मताधिकाराचे पावित्र्य टिकवायचे असेल, तर विचारांची, मूल्यांची आणि बुलंद एकजुटीची लढाई लढण्याशिवाय पर्याय नाही.

**- ॲड. शीतल शामराव चव्हाण**
**(मो. ९९२१६५७३४६)**

◆ पान १ वरून पुढे...

## शिंदे सत्तेबाहेर...

भाजपनं ११४ मतांचा बहुमताचा आकडाही क्रॉस केला आहे. असं असताना एकनाथ शिंदे हे सत्तेत जास्तीत जास्त वाटा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी भाजपकडे अडीच वर्षांसाठी महापौरपद मागितलं आहे. शिंदे हे किंगमेकरच्या भूमिकेत असल्याने त्यांनी भाजपला खिंडीत गाठण्याचा प्रयत्न केला आहे.

पण आता भाजपनं मुंबईत नवा डाव टाकल्याची चर्चा आहे. ते उद्धव ठाकरेंच्या मदतीने पण समर्थनाशिवाय सत्तेत बसण्याची रणनीती आखल्याचं बोललं जातंय. एकूणच शिवसेना शिंदे गटाला सत्तेबाहेर ठेवून आणि ठाकरे गटाचं समर्थन न घेता भाजपनं स्वत:चा महापौर करण्याचा डाव आखला आहे. पण बहुमत नसताना भाजपचा महापौर कसा होऊ शकतो? यामागे चक्रावून टाकणारं समीकरण समोर आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या महापौर पदावरून उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा झाल्याची माहिती आहे. भाजप मुंबईत सत्ता स्थापन करणार असेल, तर आपण त्यांना सहकार्य करू अशी भूमिका उद्धव ठाकरेंनी घेतल्याची माहिती आहे. महापौर निवडीच्या वेळी ठाकरे गटाचे नगरसेवक अनुपस्थितीत राहून शिंदेंना चेकमेट करण्याचा ठाकरे गटाचा प्रयत्न आहे.

शिंदे-ठाकरेविना मुंबईत भाजपचा महापौर कसा होऊ शकतो?

आता मुंबईत शिंदे आणि ठाकरे गटाची मदत न घेता भाजपचा महापौर कसा होऊ शकतो? हे पाहण्यासाठी इथं संख्याबळाचं गणित समजून घ्यावं लागेल. २२७ सदस्यसंख्या असणाऱ्या मुंबई महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी ११४ हा बहुमताचा आकडा आहे. भाजपचे ८९ आणि शिवसेना शिंदे गटाचे २९ असे मिळून महायुतीचं संख्याबळ ११८ इतकं होतं. पण आता एकनाथ शिंदेंनी महापौर पदासाठी भाजपवर दबाव आणायला सुरुवात केल्याने भाजप वेगळ्या पर्यायाची चाचपणी करत आहे. याचाच भाग म्हणून देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंशी चर्चा केल्याची माहिती आहे.

## ना.पंकजाताई मुंडे...

आणि मोलमजुरी करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कृष्णा राठोड यांच्यावर निसर्गाच्या एका अजब घटनेतून जणू दु:खाचा डोंगरच कोसळला होता. त्यांच्या पंधरा वर्षे वयाच्या मुलीला गेल्या अवघ्या तीन महिन्याच्या कालावधीत सापाने चक्क सातवेळा दंश केला, या अजब प्रकाराने तिला सात वेळा दवाखान्यात नेण्याची वेळ आली. प्रत्येक वेळी तिचा जीव वाचविण्यासाठी कृष्णा राठोड यांनी कर्ज काढून, उसनवारी करुन उपचाराचा खर्च केला. पुढील उपचारासाठी त्यांच्याकडे एकही रुपया शिल्लक नव्हता. या गरीबीतुन मुलीला कसे वाचवायचे ? हा प्रश्न त्यांना सतावत असतानाच त्यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याशी संपर्क केला आणि ही व्यथा सांगितली. ना.पंकजाताई यांनी तात्काळ संबंधित हॉस्पिटल मधील डॉक्टरांशी संपर्क साधुन सदर मुलीवर उपचार करण्याच्या सूचना केल्या. डॉक्टरांनी देखील माणुसकीच्या भावनेतून तात्काळ मुलीला सर्व औषधोपचार करुन तिला संकटातून बाहेर काढले. आता ती मुलगी सुखरूप आहे.

## 'केवळ अपमानास्पद...

रोजी पाटणा उच्च न्यायालयाने आरोपीने दाखल केलेली याचिका फेटाळली होती. याविरोधात संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले महत्त्वाचे निरीक्षण

'शाजन स्कारिया विरुद्ध केरळ राज्य' या अलीकडील खटल्याचा संदर्भ देत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने दोन अटी स्पष्ट केल्या. पहिली अट की, तक्रारदार व्यक्ती अनुसूचित जाती किंवा जमातीची असणे आवश्यक आहे. दुसरी अट, झालेला अपमान किंवा धमकी ही केवळ ती व्यक्ती 'त्या' विशिष्ट जातीची आहे याच कारणावरून दिलेली असावी.

तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून गुन्हा सिद्ध होत नाही

खंडपीठाने स्पष्ट केले की, केवळ तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून हा गुन्हा सिद्ध होत नाही, तर अपमान करण्यामागे त्या व्यक्तीला जातीवरून नीचा दाखवण्याचा हेतू असणे अनिवार्य आहे. तसेच, कलम ३ (१) (ी) अंतर्गत गुन्हा ठरण्यासाठी शिवीगाळ करताना 'जातीचा उल्लेख केलेला असणे किंवा जातीच्या नावाने अपमान करणे आवश्यक आहे. या प्रकरणी न्यायालयाने म्हटले की, उपलब्ध कागदपत्रांवरून असे कुठेही सिद्ध होत नाही की, आरोपीने तक्रारदाराच्या जातीमुळे त्याला लक्ष्य केले. एफआयआरमधील आरोप जरी जसेच्या तसे मान्य केले, तरी प्राथमिकदृष्ट्या डउ/डढ कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडल्याचे दिसत नाही. या निरीक्षणासह सर्वोच्च न्यायालयाने पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला असून संबंधित आरोपीविरुद्धची फौजदारी कारवाई रद्द केली आहे.

## शालेय राज्यस्तरीय...

वर्षाखाली प्रांजल चटप रोपे पदक, १७ वर्षाखालील मुली ज्योती शेंडगे रोपे पदक, जिज्ञासा पवार कास्यपदक वरील सर्व खेळाडू बीड जिल्ह्याचे राज्यस्तरावरती नाव उंचावले आहे तरी सर्व खेळाडूंना प्रशिक्षक उत्तरेश्वर सपाटे यांच्या मार्गदर्शन खाली सराव करत आहेत सह प्रशिक्षक मोसम शेख व थाय बॉक्सिंग बीड जिल्हा सचिव यांनी सर्व खेळाडूंची अभिनंदन केल्याची व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यालय सर अनिकेत काळे क्रीड यांनी सर्व खेळाडूचे अभिनंदन केले

## 'रस्ते सुरक्षा...

यांनी यासंदर्भात अत्यंत कडक आदेश निर्गमित केले आहेत. हेल्मेट न वापरणाऱ्या पोलिस अधिकारी, अंमलदार आणि इतर शासकीय कर्मचाऱ्यांवर केवळ दंडात्मक कारवाई करून थांबले जाणार नाही, तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून त्याची नोंद थेट सेवापुस्तिकेत (डर्शीिंळलश इेज्ञ) रण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेची गांभीर्याने अंमलबजावणी व्हावी, यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्याला कारवाईचा दैनंदिन अहवाल दररोज सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोलिस अधीक्षक कार्यालयाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जर ही मोहीम प्रभावीपणे राबवली गेली नाही, तर संबंधित प्रभारी अधिकारी आणि जबाबदार कर्मचाऱ्यांवर कडक प्रशासकीय कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही देण्यात आला आहे.

## नाथापूरात महसूल...

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार, तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणा अधिक गतिमान, संवेदनशील आणि नागरिकाभिमुख पद्धतीने काम करत असल्याचे या बैठकीतून ठळकपणे दिसून आले. कागदांच्या ढिगाऱ्यात अडकलेले प्रश्न गावातच मार्गी लागल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. 'सरकार दूर नाही, सरकार इथेच आहे' ही भावना उपस्थितांमध्ये अधिक दृढ झाली.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे विचार - सुसंवाद, शिक्षण आणि सामाजिक भान - बैठकीत बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केवळ महसूल विषयांपुरते मर्यादित न राहता, गावाच्या दीर्घकालीन सामाजिक प्रगतीवर सखोल भाष्य केले. रस्त्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनी स्पष्ट शब्दांत आवाहन केले की, 'रस्ते हे गावाचे रक्तवाहिनीसारखे असतात. मतभेद होऊ शकतात, पण ते संवादातून मिटले पाहिजेत. आपसात सुसंवाद ठेवला, तर प्रश्न न्यायालयात न जाता गावातच सुटतात'. त्यांनी ठामपणे सांगितले की, प्रत्येक गावात वाचनालय असलेच पाहिजे.

'जिथे पुस्तक आहे, तिथे विचार आहे - जिथे विचार आहे, तिथे विकास आहे' - ही म्हण त्यांनी यावेळी अधोरेखित केली. मुला - मुलींना शिक्षणाबाबत विशेष भर देताना ते म्हणाले, 'शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नाही, शिक्षण म्हणजे विचार करण्याची ताकद आहे'. गावातील मुला - मुलींना सुशिक्षित केले पाहिजे, त्यांच्यासाठी दर्जेदार शाळा, प्रशिक्षित शिक्षक, अभ्यासाचे वातावरण, वाचनाची सवय आणि आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

'आज शिकलेली पिढीच उद्याचा गाव घडवते' -'शिकाल तर टिकाल, शिकाल तर पुढे जाल', अशा घोषवाक्यांनी त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले. शिक्षणाच्या दर्जाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, 'केवळ इमारत म्हणजे शाळा नाही, तर मूल्य, शिस्त आणि संस्कार म्हणजे खरे शिक्षण'. मुलींना शिक्षणात समान संधी देणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी ठासून सांगितले.

बालविवाह रोखण्याबाबत ठाम संदेश - बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे बालविवाह रोखण्याबाबतचे सातत्यपूर्ण आवाहन अधोरेखित करण्यात आले. 'बालविवाह म्हणजे बालपणाची चोरी आहे', 'मुली शिकल्या तरच समाज उभा राहतो', हा संदेश प्रशासनाकडून सातत्याने दिला जात असल्याचे नमूद करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या मार्गदर्शनानुसार महसूल प्रशासनाने सामाजिक विषयांमध्ये सक्रिय भूमिका घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले. तर उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी क्षेत्रीय आढावा घेऊन, कामकाजात सुधारणा करण्यासाठी दिलेल्या सूचनांमुळे अशा बैठका अधिक परिणामकारक ठरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. यावेळी सरपंच सुंदर चव्हाण म्हणाले,

गावातच प्रश्न सुटत असतील, तर लोकांचा प्रशासनावरचा विश्वास अधिक मजबूत होतो'. ज्येष्ठ नागरिक अंकुश जिजा चव्हाण यांनी भावना व्यक्त करत सांगितले, 'अशी बैठक म्हणजे गावासाठी दीपस्तंभ आहे - मार्ग दाखवणारी'. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिरुद्ध गिराम यांनी केले. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, तरुण मंडळ आणि उपस्थित नागरिकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आढावा बैठक संपल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नाथापूर येथील ग्राम महसूल अधिकारी कार्यालयास भेट दिली. कार्यालयीन नोंदी, प्रलंबित कामकाज व नागरिकांशी संबंधित सेवा यांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. त्यानंतर नाथापूर येथील गट क्रमांक २४८ मधील मयुरी सुंदरराव चव्हाण यांच्या शेतात रब्बी हंगामातील ज्वारी पिकाची पिक पाहणी पूर्ण करण्यात आली. या ठिकाणी उपस्थित गावकऱ्यांसमोर ई - पीक पाहणी / नोंदणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'ई - पीक पाहणी ही शेतकऱ्याच्या हक्कासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे'. पीकविमा, अनुदान आणि नुकसानभरपाई यांचा थेट संबंध ई - पीक नोंदीशी असल्याने तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी रब्बी पिकाची ई - पीक पाहणी तात्काळ व अचूकरीत्या पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. 'आजची नोंद म्हणजे उद्याचा आधार', 'शेतकरी जागा झाला, तर व्यवस्था सरळ होते', अशा म्हणींच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली. एकूणच, नाथापूरातील ही महसूल आढावा बैठक व त्यानंतरचा क्षेत्रीय दौरा म्हणजे 'संवादातून समाधान', 'प्रशासनातून विश्वास', आणि 'शिक्षण व तंत्रज्ञानातून परिवर्तन' यांचा अर्थपूर्ण संगम ठरला - जिथे प्रशासन थेट गावात, थेट शेतात आणि थेट नागरिकांच्या प्रश्नांसमोर उभे राहिले, हाच 'प्रशासन आपल्या दारी' चा खरा प्रत्यय असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

## धान्य ते माय...

जास्त पैशाच्या मागे धावण्यापेक्षा मुलांवर संस्कार करावे- आई वडिलांनी पैसाच्या मागे लागून आयुष्य खर्च करण्यापेक्षा आपल्या मुलांना वेळ देणं गरजेचे आहे मुलांवर संस्कार करणे आवश्यक आहे त्या मुळे आपला आचरण मुलं करत असतात आई वडिलांनी आचरण सुसंकृत असले पाहिजे मुल नेहमी मोठ्याच आचरण करतात

आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा- समाजात अनेक माणसं आई वडिलांनी आश्रमात सोडतात व अनेक ठिकाणी देव सापडतात लाखो रुपये खर्च करत देव हा आपल्या आई वडिलांच्या सेवेत आहे आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा आहे

◆ पान ४ वरून पुढे...

## चांगले रस्ते....

परिसरात सभा मंडप बांधकाम, मैनाजीच्या वस्तीला जाणारा सिमेंट रस्ता तसेच केज ते धनवाडा (भगवानबाबा वस्ती) रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरण अशी विविध कामे लोकार्पित करण्यात आली. या विकासकामांमुळे महिला, शेतकरी बांधव, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.उद्घाटनप्रसंगी ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, युवक कार्यकर्ते व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## आष्टी न्यायालयाला....

भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी आयोजित कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष ॲड. ताहेर साहेब, सचिव ॲड. उद्धव पोकळे, ज्येष्ठ विधीतज्ज्ञ बाबूराव अनारसे, रावसाहेब जगताप आबा, श्रीकृष्ण देशपांडे, बाळासाहेब शेकडे, अविराज निंबाळकर, रियाज सय्यद, ॲड. तांदळे, ॲड. रत्नदीप निकाळजे, ॲड. झांजे साहेब, ॲड. आदिनाथ पोकळे, ॲड. बाबासाहेब घोलप, ॲड. हनुमंत शिंदे, ॲड. विजय ढोबळे, ॲड. रमाकांत देशमुख, ॲड. विजय शेकडे, ॲड. डी. सी. शेख, ॲड. शरद कदम, ॲड. याशीर शेख, ॲड. खिल्लारे, ससाणे, पोकळे, भोकरे यांच्यासह आष्टी वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित वकिलांनी सांगितले की, आमदार सुरेश आण्णा धस यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून, प्रशासकीय पातळीवर प्रभावी भूमिका बजावत आष्टीसाठी उपजिल्हा न्यायालय मंजूर करून घेतले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे आष्टी तालुक्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले असून, तालुक्याला स्वतंत्र ओळख मिळाली आहे. या निर्णयामुळे भविष्यात आष्टी न्यायालयात मोठ्या स्वरूपातील दिवाणी व फौजदारी प्रकरणांची सुनावणी होणार असून, न्यायदानाची प्रक्रिया अधिक सक्षम होणार असल्याचे मत वकील वर्गाने व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी आष्टी वकील संघाच्या वतीने लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे मनः पूर्वक आभार मानण्यात आले.

## नवनिर्वाचित नगरसेवकास....

होतात. हे मागील अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे आपल्या पदाचा गैरवापर करून त्यांनी वेळोवेळी वरिष्ठांचे न ऐकणे, स्वच्छता कामगारांना दमदाटी करणे आणि आता तर लोकनिर्वाचित नगरसेवकालाच आर्वाच्च भाषा वापरली आहे. त्यामुळे तात्काळ त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्यांची इतरत्र बदल करण्यात यावी. अन्यथा या प्रश्नी लोकविकास महाआघाडीच्या वतीने कायदेशीर बाबी तपासून योग्य ती भूमिका घ्यावी लागेल. याची आपण नोंद घ्यावी. असा इशारा लोकविकास महाआघाडीच्या वतीने निवेदक राजकिशोर मोदी (नगरसेवक तथा प्रमुख - लोकविकास महाआघाडी), बबनराव लोमटे (नगरसेवक, न.प.अंबाजोगाई), दिनेश भराडीया (उपनगराध्यक्ष, न.प.अंबाजोगाई), सय्यद ताहेर भाई (गटनेता, लोक विकास महाआघाडी, न.प.अंबाजोगाई.), ज्येष्ठ नगरसेवक हाजी इस्माईल हिरू गवळी, महेश बालासाहेब लोमटे, ऍड.विकास रामकृष्ण काकडे, महेश बाळासाहेब कदम, आकाश जिवनराव कराड, राजपाल संभाजी जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, मालू भगवान जोगदंड, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, शेख शिरीन अशफाक, सौ.जयश्रीताई पृथ्वीराज साठे, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.दिपाताई बबन ऊर्फ दाजीसाहेब लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, शेख शमीम शेख रहीम, सौ.रेखाताई विलास जाधव, बशीरा शफीक सय्यद, सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे आदी नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन देताना लोक विकास महाआघाडीचे अमोल लोमटे, रौफभाई बिल्डर, मोईनभाई शेख, सचिन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 78 महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे पंचवीस वर्षापासून बिन पगारी शोषण

## राष्ट्रउभारणी उच्च शिक्षणाचा ढोंगीपणाचा पर्दाफाश

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात २४ नोव्हेंबर २००१ रोजी विनाअनुदानित धोरण आले. हे कायम विनाअनुदानित धोरण येण्यापूर्वीची ७८ महाविद्यालय आहेत. या महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाने २५ वर्ष बिन पगारी राबवून घेतली आहे. यांना अनुदान देण्याच्या नावाखाली चार वेळेस तपासणी केली तरीही शासन अनुदान देण्यास तयार नाही. त्यामुळे ७८ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आयुष्य उध्वस्त होत आहे. महाराष्ट्र राज्यातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे गेली २५ वर्ष बिनपगारी शोषण करून उच्च शिक्षण खात्याला उत्कृष्ट राष्ट्र उभारणी करता येईल का ?



असा प्रश्न जनतेला पडलेला आहे. २४ नोव्हेंबर २००१ च्या महाविद्यालयातील प्राध्यापक पीएचडी, नेट- सेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांना विद्यापीठांनी कायम नियुक्ती दिलेली आहे परंतु त्यांना पगार नाही. आता लवकरच महाराष्ट्रातील विद्यापीठ व वरिष्ठ महाविद्यालयात ५२०० जागा शासन भरणार आहेत. या जागा भरायच्या आधी एकतर २४ नोव्हेंबर २००१ च्या आधीच्या महाविद्यालयांना शासनाने अनुदान द्यावे किंवा प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अन्य महाविद्यालयात रिकाम्या जागेवर समायोजन करावे अशी मागणी २० नोव्हेंबर २००१ च्या कृती समितीने केली आहे. २४ नोव्हेंबर २००१ च्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सेवानिवृत्तीसाठी कोणाचे ५, कोणाचे १०, कोणाचे १२ वर्षे राहिलेले आहे. त्यामुळे त्यांना एक तर अनुदान द्यावे नसता इतरत्र अनुदानित महाविद्यालयात समायोजन करावे अशी मागणी कृती समितीने केलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ७८ महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी यांचा प्रश्न कसे सोडवतात याकडे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे पालकांचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे लक्ष लागलेली आहे.

**बिन पगारी पंचवीस वर्षे प्राध्यापक योजना म्हणजे प्राध्यापकावर लादलेले शासकीय शोषण आहे. बिन पगारी नोकरी, अनिश्चित सेवा आणि सामाजिक असुरक्षितता यामुळे प्राध्यापकांचे वैयक्तिक आयुष्य उध्वस्त झालेले आहे. लग्न, कुटुंब, घर खर्च आणि भविष्यासंबंधी प्रश्नांनी प्राध्यापक मानसिक तणावाखाली आहे. अशा परिस्थितीत गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाची अपेक्षा करणे म्हणजे ढोंग ठरत आहे. प्राध्यापक आर्थिक दृष्ट्या सुरक्षित नसेल तर तो समाजाला सक्षम नागरिक देऊ शकणार नाही. त्यामुळे राज्य शासनाने तात्काळ ७८ महाविद्यालयातील प्राध्यापकांना अनुदान द्यावे किंवा इतरत्र अनुदानित महाविद्यालयात समायोजन करावे हा दयेचा नव्हे तर न्यायाचा प्रश्न आहे. – प्रा डॉ रमेश खिळदकर, (२४ नोव्हेंबर २००१ कृती समिती बीड जिल्हा)**

# भाग्योदय इंग्लिश मिडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

भाग्योदय इंग्लिश मिडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सालेवडगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह. भ. प. रामानंदपुरी महाराज होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मधुकर शेटे, युवा नेते गणेश शिंदे तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रदीप शिंदे सर उपस्थित होते. यावेळी सरपंच सौ. प्रियंकाताई महेश कराळे, उपसरपंच सिदू गोविंद हजारे, माजी जि. प. सदस्य शिवाजी डोके, माजी सभापती अशोक इथापे, माजी उपसरपंच अशोक दहातोंडे, नगरसेवक शरीफ शेख, पत्रकार प्रविण पोकळे, माजी सरपंच महादेव डोके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



तसेच विशाल झांबरे, भरत जाधव, सौ. सुरेखाताई गुंड, सौ. सुनिता गायकवाड, शिवाजी थोरात, सचिन दळवी, सचिन घुले, शरद दहातोंडे, शरद कराळे, दिनेश डोके, सचिन डोके, राहुल शिंदे, अनिकेत रासकर, मधुकर कराळे, उमेश डोके यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार व सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करणे हा होता. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी अंगीकारण्याचा, अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा तसेच मोबाईलचा मर्यादित वापर करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंजली शिंदे मॅडम यांनी केले, तर प्रास्ताविक संस्थेचे संचालक श्रीकांत बारवकर सर यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज विकास संस्थेच्या भाग्योदय इंग्लिश मिडियम स्कूलला यावर्षी दोन वर्षे पूर्ण झाली असून, मागील वर्षी ८० पेक्षा अधिक असलेली पटसंख्या यावर्षी वाढून १५० पेक्षा अधिक झाली आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व प्रगती याचे हे द्योतक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंजली शिंदे मॅडम, वैष्णवी हजारे मॅडम, ढोले मॅडम, सौ. सुनिता गायकवाड मॅडम, सौ. परभणे मॅडम, सौ. चोभे मॅडम, सौ. मुळे मॅडम, सौ. कांचन मॅडम, जयसिंग काळे सर तसेच कर्मचारी सौ. राणी भिंगारदिवे, अर्जुन दळवी, अजिनाश चोभे, अशोक शिंदे, भाऊसाहेब चोभे, भास्कर पोटदुखे यांनी विशेष परिश्रम घेतले.संस्थेचे संचालक श्रीकांत बारवकर सर, कृष्णा हजारे सर व पुष्पलता शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात 'आनंद नगरी' व 'हळदी–कुंकू' कार्यक्रम मोठ्या उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी आनंद नगरी व हळदी–कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. आनंद नगरीचे उद्घाटन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर होते. व्यासपीठावर वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका वरपे मॅडम, गावातील प्रतिष्ठित नागरिक सोलनकर, संजय मस्के, दिलीप जोगदंड, अशोक सातपुते, चिल्लेवाड सर, टेकाळे मॅडम, वाव्हळ सर, साळुंके मॅडम, सानप मॅडम, गुजर सर आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य, स्वावलंबन, कष्टाळूपणा, चिकाटी यांसारखे गुण रुजावेत तसेच त्यांना स्वतः च्या क्षमतेचे प्रदर्शन करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे या आनंद नगरी या उपक्रमाचे आयोजन आज सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्यातील सुप्त गुणांचे दर्शन घडवले. 'विद्येचे मंदिर, आनंदाचे केंद्र' या संकल्पनेनुसार शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स उभारले होते. खाऊची दुकाने, खेळणी, भाजीपाला, आईस्क्रीम, विविध खेळ तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तू व शैक्षणिक साहित्याची विक्री करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या स्टॉलवरून मनसोक्त खरेदीसाठी पालक व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. या आनंद नगरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे प्रत्यक्ष धडे मिळाले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ होत असल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी स्वतः केलेल्या कमाईचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.याच वेळी आयोजित माता–पालक हळदी–कुंकू कार्यक्रमास शिदोड गावातील माता–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच गावकरी, प्रतिष्ठित नागरिक, आजी–माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. राष्ट्रगीताने या आनंददायी मेळाव्याचीसांगताकरण्यातआली.

## तिगाव वस्ती येथे भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन ह.भ.प. ज्ञानेश्वरी ताई सोळंके यांचे प्रवचन

**वडवणी । प्रतिनिधी**



तालुक्यातील तिगाव वस्ती या ठिकाणी, श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भागवत कथाकार ह.भ.प ज्ञानेश्वरी ताई सोळंके वृंदावन धाम यांचे प्रवचन होणार आहे, मृदुंगचार्य ह.भ.प, माऊली महाराज कोल्हे यांची उपस्थिती लाभणार आहे. सिंथ वादक म्हणून ह.भ.प. भारती महाराज हे उपस्थित राहणार आहेत योगेश देवा जोशी हे सुद्धा या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत, सदरील भागवत कथा दुपारी बारा ते ते चार या कालावधीमध्ये होणार आहे या भागवत कथेला परिसरातील गावातील ग्रामस्थ व नवतरुण मित्र मंडळ तिगाव वस्ती गावकऱ्यांनी केले आहे.

# राज्य क्रीडा दिन आयोजनामुळे शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होते : निवासी उपजिल्हाधिकारी, मा. श्री. शिवकुमार स्वामी







**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाद्वारे १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिन राज्य क्रीडा दिन म्हणुन उत्साहात साजरा करण्यात येतो.

दिवंगत खाशाबा जाधव गोळेश्वर, कराड जिल्हा सातारा यांनी १९९५ मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिपीक क्रीडा स्पर्धा मध्ये पहिले वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावुन देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिन दि. १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृती जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दर वर्षी राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येतो.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे दि. १५ जानेवारी २०२६ रोजी ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिन राज्य क्रीडा दिनानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजना करण्यात आले. सदर प्रसंगी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडू विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा दिनाच्या आयोजनामुळे शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होती, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. शिवकुमार स्वामी यांनी केले. राज्य क्रीडा दिन या कार्यक्रमाचे औचित्य साधुन छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल ते जिल्हा क्रीडा संकुल, बीड पर्यंत पायी रॅली चे आयोजन करण्यात आले. तसेच ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेस निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. शिवकुमार स्वामी, प्रा. जे. पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री. अरविंद विद्यागर यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले, सदर प्रसंगी मा. प्रा. दिनकर थोरात, मा. विनायक वझे, मा. शरद अंदुरे, मा. राहुल गुरखुदे, मा. उत्तरेश्वर सपाटे, मा. बापुराव भोसले, मा. विलास ठोबरे, मा, दिपक बिलपे, मा. अशोक कांबळे, मा. सुरेश चौधरी, मा. विशाल गिरी, मा. पठाण गब्बर, मा. माऊली ढवळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री. अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार क्रीडा अधिकारी श्री. अनिकेत काळे यांनी मानले. राज्य क्रीडा दिनाचे यशस्वीपने आयोजन होणे करीता जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी, श्री. कालिदास होसुरकर, श्री. अनिकेत काळे, श्री. सतिश राठोड, श्री. अविनाश पाटील, कार्यासन प्रमुख श्री. रेवननाथ शेलार, श्री. धनेश करांडे, श्री. मयुर पाठक आदिनी परिश्रम घेतले.



## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आज राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अंकुश काळे, नॅक समन्वय डॉ. मकबुल सलीम व कार्यक्रमाचे अध्यक्ष शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. जाधव कृष्णा उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. अंकुश काळे यांनी रस्ते विषयी सुरक्षा व त्यातून अपघातात होणाऱ्या मानवी चुका पावसाळ्यामध्ये गाडी सावकाश चालवावी, रस्त्यावर तेल पडलेले असताना त्याचे निरीक्षण करून प्रवास करावा, सोबतच हेल्मेटचा वापर करावा, वाहन चालवताना मद्यपान करू नये. तसेच रस्त्यावर अपघात वगैरे घडल्यास त्यांना तातडीची मदत करावी, त्यांना हॉस्पिटल पर्यंत पोहोचावे.

# गिताई बालशिक्षण केंद्र येथे मकर संक्रांतीच्या सणाचे हळदी कुंकू समारंभ संपन्न



**वडवणी । प्रतिनिधी**

शहरातील गिताई बालशिक्षण केंद्रामध्ये मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून हळदी–कुंक समारंभ शनिवारी दि. १७–०१–२०२६ रोज आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी नगरीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप तशाच प्रमुख पाहुण्या म्हणून वडवणी पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस अधिकारी स.पो.नि. वर्षा व्हगाडे–शिंदे मॅडम उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली स.पो.नि.वर्षा व्हगाडे या मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, हळदी कुंकू साठी ग्रुपने जात असताना आपण बोलण्यामध्ये दंग असतो तेव्हा एखादी व्यक्ती बाईकवर जात असताना रुमाल तोंडाला बांधून दागिने घेण्याच्या प्रयत्नात करतात म्हणून माता–भगिनींनी सावध राहायला हवा असा मोलाचा संदेश त्यांनी देऊन मकर संक्रांतीच्या सणाच्या माता भगिनींना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमांमध्ये विशेष करून विधवा महिलांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.तसेच प्राध्यापक महिला,सामाजिक कार्यकर्त्या,आदर्श शिक्षिका, संस्थाचालिका महिला,अशा माता–भगिनींचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला यामध्ये आदर्श शिक्षिका अनिता मस्के, राऊत,प्राध्यापिका प्रतिभा माणिकराव शेळके, शिवसेना अध्यक्षा प्रमिलाताई माळी,सुरेखा मसुरे, सारिका कुलकर्णी,आजबे, यांच्या शाळेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुपाली अजय भैरट,गिता भैरट,दिपाली घाटुळे, वैष्णवी सुरवसे,माया सुरवसे, संगिता खुपसे,लव्हाळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सौ. रूपाली अजय भैरट यांनी केले तर सूत्रसंचालन गितांजली रंगराव लव्हाळे यांनी केले. व उपस्थितांचे आभार वैष्णवी सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने माता भगिनी उपस्थित होत्या.


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: १०६/२०२६**

**भगवान शिंदे (मयत) व इतर वि. निरंक**

**अर्जदार – १) भगवान पि. लिंबाजी शिंदे (मयत)– वारस १/२) तारामती भ्र. भगवान शिंदे वय ८२ वर्षे, धंदा घरकाम रा. कोळवाडी ता.जि.बीड. १/२) राम पि. भगवान शिंदे वय ४१ वर्षे, धंदा–नौकरी, रा. कोळवाडी ता.जि. बीड. १/३) लक्ष्मण पि. भगवान शिंदे वय – ३१ वर्ष, धंदा शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड. २) श्रीराम पि. लिंबाजी शिंदे (मयत)– वारस– २ – १) सुमलबाई भ्र. श्रीराम शिंदे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. कोळवाडी ता.जि.बीड, २– २) सतीश पि. श्रीराम शिंदे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. कोळवाडी ता.जि. बीड, २–३) बंकट पि. श्रीराम शिंदे,वय– ३७ वर्षे, धंदा– शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड. ३) सुखदेव पि. लिंबाजी शिंदे (मयत)– वारस ३– १) सोमाबाई भ्र. सुखदेव शिंदे वय– ५० वर्षे, धंदा घरकाम रा. कोळवाडी ता.जि.बीड. ३–२) अशोक पि. सुखदेव शिंदे, वय– ३७ वर्ष, धंदा– शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड, ३–३) आकाश पि. सुखदेव शिंदे वय ३३ वर्षे, धंदा– शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड**

ज्याअर्थी मयत नामे आश्राबाई लिंबाजी शिंदे रा. कोळवाडी ता.जि.बीड हे दि. २८.०२.२०२४ रोजी मौजे कोळवाडी ता.जि.बीड येथे मयत झाले आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळावे करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ अन्वये या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे आश्राबाई लिंबाजी शिंदे रा. कोळवाडी ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज १५–०१–२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : ०२/०३/२०२६**
**(मार्फत ॲड. एस. डी. घोडके बीड)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ •



*बीड मराठा महासंघाचे अध्यक्ष श्री. मा. विनोद आप्पा इंगोले यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठवाड पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे छायाचित्रात दिसत आहेत.*

# चांगले रस्ते, शाळा, शुध्द पाणी ही गावाच्या विकासाची ओळख: खा.बजरंग सोनवणे



## टाकळी (ता.केज) येथे विविध विकासकामांचे लोकार्पण

**केज । प्रतिनिधी**

चांगले रस्ते, शुद्ध पाणी, वीजपुरवठा व बालकांसाठी अंगणवाडी सुविधा, दर्जेदार शाळा या गावाच्या खऱ्या विकासाची ओळख असल्याचे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील टाकळी (ता. केज) येथे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध विकासकामांचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते बोलत होते. गावाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारी तसेच भविष्यातील पिढीसाठी दिशा देणारी ही कामे टाकळीच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा असल्याचे खा.सोनवणे यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी टाकळी ते पाचीअंबा वस्ती रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले असून, या मार्गामुळे दळणवळण सुलभ होणार आहे. तसेच गावअंतर्गत स्मशानभूमीचा विकास, दलितवस्ती व कदमवाडी येथे अंगणवाडी खोली बांधकाम, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी पाणी फिल्टर बसविणे, गावासाठी २४ तास गावठाण लाईट फिटर सुविधा सुरू करण्यात आली आहे. इजगर लवन तलाव येथे नवीन उफेज रोहित्र (डी.पी.) बसविणे, लक्ष्मी आई मंदिर ▶▶ उर्वरित पान २ वर

## रब्बी हंगाम २०२५–२६ ची ई–पीक शेतकऱ्यांनी पाहणी दि. २४ जानेवारीपर्यंत पूर्ण करणे

**बीड । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम २०२५–२६ करिता ई–पीक पाहणी (Digital Crop Survey - DCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी सुरु झाल्याबाबत व पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने बीड जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाची ई–पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपद्वारे दिनांक १०.१२.२०२५ पासून पीक नोंदणी सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या 'AgriStack' संकल्पने अंतर्गत ही मोहीम राबवली जात असून, रब्बी हंगामासाठी पीक नोंदणीची प्रक्रिया १० डिसेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे. बीड जिल्ह्यामध्ये दि. १९.०१.२०२५ रोजी पर्यंत जिल्हयातील शेतकऱ्यांकडून केवळ ३.१२ टक्के owners plot ची पिक पाहणी पूर्ण करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी स्वतःहून केलेली पीक नोंदणी अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. १. सातबारा उताऱ्यावर पिकाची अचूक नोंद होते. २. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास, पीक विम्याचा लाभ मिळवण्यासाठी ई–पीक पाहणीचा आधार घेतला जातो. ३. किमान आधारभूत किंमत (MSP) नुसार शेतमाल खरेदी केंद्रावर विक्री करण्यासाठी ही नोंद अनिवार्य आहे. ४. बँकांकडून पीक कर्ज घेताना सातबारा उताऱ्यावरील पिकाची नोंदणी तपासली जाते. करीता बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी भविष्यात कोणत्याही तांत्रिक अडचणीला सामोरे जावे लागू नये याकरीता रब्बी हंगाम २०२५–२६ ची पीक नोंदणी ई–पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे शेवटच्या तारखेची वाट न पाहता २४ जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करावी, असे. जिल्हाधिकारी बीड यांनी आवाहन केले आहे.

## बारावी प्रात्यक्षिक परीक्षा साहित्य वाटप बाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) फेब्रु/मार्च–२०२६ च्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापन तसेच छडटक्र अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा, माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा दि. २३.०१.२०२६ ते दि.०९.०२.२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. प्रात्यक्षिक, तोडी, श्रेणी परीक्षेचे साहित्य मंगळवार दि. २०.०१.२०२६ रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत नेहमीच्या खालील जिल्हा वितरण केंद्रावर वितरीत करण्यात येणार आहे. प्रात्यक्षिक साहित्य केंद्राचे नांव व प्रात्यक्षिक परीक्षा साहित्य, परीक्षेचे सुचना पत्रके व बेळापत्रक, इतर पत्रे, साहित्य वाटप ठिकाण पुढीलप्रमाणे: १. विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर – छत्रपती संभाजीनगर शहरी ग्रामीण सर्व तालुके. २. बापुजी साळुंके विद्यालय, बीड. – बीड, गेवराई पाटोदा, आष्टी, शिरुर कासार, माजलगांव, बडवणी. ३. जिल्हा परीषद मुलांची शाळा, अंबाजोगाई. – अंबाजोगाई, केज, धारुर, परळी वैजनाथ. ४. जिल्हा परीषद मुलांची शाळा, परभणी. – परभणी सर्व तालुके. ५. श्री. शंकराव उर्दू हायस्कुल,हिंगोली – हिंगोली सर्व तालुके. ६. जिल्हा परीषद मुलांची प्रशाला, जालना. – जालना सर्व तालुके. तरी उपरोक्त साहित्य वाटपाची सर्व संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी व उपरोक्त वितरण केंद्रावरुन प्रात्यक्षिक/मौख्यिक परीक्षेचे साहित्य स्विकारण्यासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रतिनिधी पाठवून सदरहु परीक्षेचे साहित्य हस्तगत करावे.

## डिसेंबर – २०२५ अखेरचे मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ई–आर १ सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सार्वजनिक क्षेत्रातील केंद्र व राज्य शासन यांची सर्व कार्यालये, अंगिकृत उद्योग / व्यवसाय / महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद / पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील २५ किंवा अधिक लोक काम करतात अशा सर्व आस्थापना, उद्योग, व्यापार , व्यवसाय, कारखाने यांना सेवायोजन कार्यालये ( रिक्तपदाची सुचना देणे सक्तीचे ) कायदा १९५९ व त्या अंतर्गत नियमावली १९६० नुसार त्रैमासिक विवरणपत्र ई–आर १ माहे डिसेंबर २०२५ तिमाही संपल्यानंतर ३० दिवसाच्या आत (३१ जानेवारी,२०२६ पर्यत ) सादर करणे बंधनकारक आहे. या प्रमाणे नियोक्त्यांच्या लॉग–इन मध्ये विवरणपत्र www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या प्रमाणे नियोक्त्यांची डिसेंबर २०२५ या तिमाहीचे विवरणपत्र ई–आर १ दि. ३१ जानेवारी,२०२६ पर्यत पर्यंत सादर करावे. यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in वेबसाईट ओपन करुन एम्प्लॉयर ( लीस्ट अ जॉब ) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉग इनमध्ये नियोक्त्यांचा युजर आय डी व पासवर्ड वापरुन लॉग इन करुन ईआर रिपोर्ट मधील ई–आर १ या ऑप्शनवर क्लीक करुन ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. यासाठी काही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत (०२४४२) २९९११६ या कार्यालयाच्या दूरध्वनीवर श्री.राजु कटक (क.कौ.वि.मा. अ.) यांच्याशी संपर्क करावा. मो.नं. ७०२०४१४२३१ सेवायोजन कार्यालये (रिक्तपदाची सुचना देणे सक्तीचे) कायदा १९५९ व त्या अंतर्गत नियमावली १९६० मधील तरतुदी नुसार वरील प्रमाणे सर्व आस्थापनांनी डिसेंबर २०२५ या अखेर आपल्या वेतन पटावर असलेल्या सर्व मनुष्यबळाची माहीती ई–आर १ विवरणपत्र ३१ जानेवारी,२०२६ पुर्वी वरील वेबसाईटवर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे, यात कसूर झाल्यास कसूरदार आस्थापनांवर कायदेशिर कारवाई होऊ शकेल, याची नोंद घ्यावी असे समाधान किरवले, सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## आष्टी न्यायालयाला सिनियर डिव्हिजन मंजुरीबद्दल आ. सुरेश आण्णा धस यांचे वकील संघाकडून आभार

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्याच्या न्याय व्यवस्थेला ऐतिहासिक बळ देणाऱ्या सिनियर डिव्हिजन (उपजिल्हा) न्यायालय मंजुरीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आष्टी वकील संघाच्या वतीने लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे जाहीर आभार मानण्यात आले.

आष्टी न्यायालयास उपजिल्हा न्यायालयाची मंजुरी मिळाल्यामुळे तालुक्यासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, यापुढे न्यायप्रक्रियेसाठी जिल्हा ठिकाणी जाण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे नागरिकांचा वेळ, खर्च व श्रम वाचणार असून न्याय अधिक सुलभ, जलद आणि प्रभावीपणे मिळण्यास मदत होणार आहे. हा निर्णय सामान्य नागरिक, वकील वर्ग तसेच संपूर्ण न्यायालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार असल्याची ▶▶ उर्वरित पान २ वर



*माजलगाव मंजरथ येथील सहस्त्र ब्राह्मण भोजन कार्यक्रमाच्या निमित्ताने बीड जिल्हा भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख नवनाथ अण्णा शिराळे, भाजपा महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य अरुण आबा राऊत मा नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, अभय भैय्या होके, विनायक मामा रत्नपारखी दत्ता महाजन, ईश्वर आप्पा खुरपे, रुपाली ताई कचरे, सतीश देवा जोशी, प्रा सिध्देश्वर राठोड आणि समस्त माजलगाव भाजपा पदाधिकारी, नेतेगण उपस्थित राहून सदरील कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित.होते*

## माजलगावात अभद्र युतीमुळे मतदारांचा भ्रमनिरास

### भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके यांचा सोळंके–चाऊस युतीवर तीव्र हल्लाबोल

**माजलगाव । प्रतिनिधी**



न प उपाध्यक्ष च्या पार्श्वभूमीवर अभद्र युतीमुळे मतदारांचा पूर्णतः भ्रमनिरास झाला असून, जनतेच्या अपेक्षांना तडा गेला आहे, असा गंभीर आरोप ज्ञानेश्वर मेंडके यांनी केला. माजलगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी भारतीय जनता पक्ष च्या वतीने सोळंके–चाऊस युतीवर जोरदार प्रहार केला. ज्ञानेश्वर मेंडके म्हणाले की, सत्तेसाठी तत्त्वांशी तडजोड करत करण्यात आलेली ही युती म्हणजे मतदारांच्या विश्वासघाताचा कळस आहे. निवडणुकीपूर्वी एकमेकांवर आरोप करणारे नेते सत्तेसाठी एकत्र येत असल्याने जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे. विकास, पारदर्शकता आणि प्रामाणिक राजकारणाच्या नावाखाली फसवणूक केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सोळंके–चाऊस युती ही केवळ स्वार्थासाठी असून याचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसणार असल्याचे मेंडके यांनी स्पष्ट केले. आगामी काळात जनता या अभद्र युतीला योग्य धडा शिकवेल, असा विश्वास व्यक्त करत भाजप जनतेसोबत ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी सांगितले.या वेळी दीपक मुंडे ,रत्नपारखे मामा ,विनोद शिंदे ,नारायण भले आदी पदाधिकारी पत्रकार परिषेदेस उपस्थित होते




*बीड चे तहसीलदार श्री.चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते मौजे ईट येथे तहसीलचे प्रमाणपत्र उत्पन्न नॅशनॅलिटी डोमासाईल कास्ट सर्टिफिकेट ईडब्ल्यूएस नॉन क्रिमिनल असे अनेक शेतीमध्ये निघणारे प्रमाणपत्र वाटप करतांना जय सेवालाल सेतूकेंद्र चालक परमेश्वर चव्हाण, सखाराम नरनाळे, चंद्रकांत भोसले आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

## बीडच्या कृष्णा गायकवाडची U-१४ महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

### बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून अभिनंदन

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा होतकरू खेळाडू कृष्णा गायकवाड याची १४ वर्षांखालील (ण–१४) महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली असून या उल्लेखनीय यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कृष्णा गायकवाडने सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध सराव आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर राज्य संघात स्थान मिळवले आहे.

कृष्णा गायकवाडच्या या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारत भूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम यांच्यासह महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान,जैतुल्ला खान,सिद्दीक देशमुख,संजय उडान,शुभम धुत,शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदी पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कृष्णा गायकवाडची ही निवड बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असून भविष्यात तो राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.



*बीड स्वच्छ शहर सुंदर शहर प्रत्येकानी आपल्या घरासमोर अशा नाला बंद करून नाली मध्ये देशपांडे नामक व्यक्तिने डॉ. सारीकाताई क्षीरसागर यांच्या वॉर्डमध्ये नाली बंद करून असा कचरा टाकून नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.*

# नवनिर्वाचित नगरसेवकास अर्वाच्च भाषा वापरणाऱ्या स्वच्छता निरिक्षकावर तात्काळ कार्यवाही करा

### लोक विकास महाआघाडीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



लोक विकास महाआघाडीच्या नवनिर्वाचित नगरसेवकास अर्वाच्च भाषा वापरणाऱ्या स्वच्छता निरिक्षकावर तात्काळ कार्यवाही करा अशी मागणी लोक विकास महाआघाडीच्या वतीने सोमवार, दिनांक १९ जानेवारी रोजी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अंबाजोगाई नगरपालिकेतील लोक विकास महाआघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक यांना त्यांनी शहरातील मुख्य रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिव्हायडरच्या आतील झाडांना पाणी टाकण्यात येत नाही व सदरील झाडे सुकुन जात आहेत. हा सार्वजनिक विषय मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्या निदर्शनास आणून दिला असता. यावेळी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात उपस्थित असलेले अंबाजोगाई नगरपरिषदेचे स्वच्छता निरिक्षक यांनी लोकनिर्वाचित नगरसेवक यांना आर्वाच्च भाषा वापरली व मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच त्यांना अपमानीत केले. या घटनेचा आम्ही जाहिर निषेध करीत आहोत. लोकप्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या नगरसेवक यांची अवमानना केल्याप्रकरणी संबंधित स्वच्छता निरिक्षक यांच्यावर आपल्या कार्यालयाच्या मार्फत तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. कारण, सदरील स्वच्छता निरिक्षक हे त्यांची इतरत्र बदली झालेली असताना सदर बदली रद्द करून पुन्हा अंबाजोगाईत रूजू ▶▶ उर्वरित पान २ वर